दाखल तारीख : १९/०४/२०२५
नोंदणी तारीख : १९/०४/२०२५
निकाल तारीख : १०/०७/२०२६
कालावधी : **०१ ०२ २१**
वर्ष महिने दिवस

## <u>भाग 'अ'</u>

(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)

[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (१)]

| | |
|---|---|
| **<u>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, वाशी यांचे न्यायालयात</u>**<br>(पिठासीन अधिकारीः श्रीमती एम. व्ही. पाटील–राठोडे) | |
| (न्यायनिर्णयाची तारीख : १०/०७/२०२६) | |
| **संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१५४/२०२५** | **निशाणी क्र.१२ लगत** |
| **(CNR No.MHOS10-000679-2025)** | |
| गुन्हा रजिष्टर क्रमांक | ४१/२०२५ – राज्य उत्पादन शुल्क विभाग, भरारी पथक, धाराशिव, जि. धाराशिव. |
| अभियोग पक्ष | **महाराष्ट्र शासन**<br>मार्फत — दुय्यम निरीक्षक,<br>राज्य उत्पादन शुल्क विभाग, भरारी पथक, धाराशिव, जि. धाराशिव. |
| अभियोग पक्षातर्फे | श्री. एस.आर.सय्यद, सहा. सरकारी अभियोक्ता |
| आरोपी | **अशोक दादाराव गवळी,**<br>वय : ६७ वर्षे, व्यवसाय : मजुरी,<br>रा. पारा, ता. वाशी, जि. धाराशिव |
| आरोपीतर्फे | श्री. एस. एम. ढेपे, विधीज्ञ |

## <u>भाग 'ब'</u>

[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (२)]

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | १३/०२/२०२५ |
| प्रथम खबरीची तारीख | १३/०२/२०२५ |
| दोषारोपपत्राची तारीख | १९/०४/२०२५ |

| | |
|---|---|
| प्रतिकथन नोंदविल्याची तारीख | १६/१०/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १२/०६/२०२६ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याची तारीख | १०/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | १०/०७/२०२६ |
| शिक्षेचा आदेश पारीत केल्याची तारीख | --- |

**आरोपीचा तपशील**

| अ.क्र. | आरोपीचे नाव | भा.ना.सु. सं. कलम ३५(३) प्रमाणे नोटीस | जामीनावर सोडल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा दिली | दिलेली शिक्षा | भा.ना.सु.सं. कलम ४६८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अशोक दादाराव गवळी | १३/०२/२०२५ | १६/१०/२०२५ | म.दा. अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) | निर्दोष मुक्त केले | – | – |

**भाग 'क'**

[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (३)]

अभियोग पक्ष/ बचाव पक्ष/ न्यायालयीन साक्षीदारांची यादी

**अ. अभियोग पक्षाचे साक्षीदार :**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.१ | बाबु मेचेल काळे | घटनास्थळ व जप्ती पंच |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार, असल्यास :**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| – | – | – |

**क. न्यायालयाचा साक्षीदार, असल्यास :**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| – | – | – |

अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने दिलेल्या निशाणीबध्द दस्तांची यादी

**अ. अभियोग पक्ष :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

**ब. बचाव पक्ष :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

**क. न्यायालयाने दिलेली निशाणी :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

**ड. महत्वाच्या वस्तु :**

| अ.क्र. | महत्वाची वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | १ | १८० मि.ली. च्या देशी दारु स्पेशल संत्रा कंपनीच्या २४ सिलबंद बाटल्या, एकुण किंमत रु.१,६८०/– |

**न्या य नि र्ण य**

(घोषीत दिनांक : १०/०७/२०२६)

प्रस्तुत खटला आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम

६५(ई) प्रमाणे शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयाकरिता चालविण्यात आला.

२. माझे विचारार्थ उपस्थित झालेले मुद्ये व त्यावर नोंदविलेले निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे :

| मुद्ये | निष्कर्ष |
|---|---|
| १. दि.१३/०२/२०२५ रोजी जयशंकर पान स्टॉलच्या बाजुला, पारा चौक,, पारा, ता. वाशी, जि. धाराशिव येथे आरोपी १८० मि.ली. च्या देशी दारु स्पेशल संत्रा कंपनीच्या २४ सिलबंद बाटल्या, एकुण किंमत रु.१,६८०/- बेकायदेशिररित्या विक्री करण्यासाठी आपल्या कब्जात बाळगताना मिळून आला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | ... नाही. |
| २. अंतिम आदेश काय ? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## कारणमिमांसा

३. आरोपीवरील दोषारोप सिध्द करण्याकरिता अभियोग पक्षातर्फे घटनास्थळ व जप्ती पंच बाबु मेचेल काळे (सा.क्र.१) यांचा पुरावा नोंदवण्यात आला. आरोपीने त्याच्या बचावाप्रित्यर्थ कोणताही पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. अभियोग पक्षातर्फे सादर करण्यात आलेल्या पुराव्यामध्ये आरोपीविरुध्द प्रतिकुल बाबी दर्शविणारा कोणताही पुरावा अभिलेखावर आला नाही. त्यामुळे आरोपी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५१ अन्वयेचे निवेदन नोंदवण्यात आले नाही.

४. अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री.एस.आर.सय्यद व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस. एम. ढेपे यांचा युक्तिवाद ऐकला.

**मुद्दा क्र.१ करिता** :

५. बाबु (सा.क्र.१) यांनी त्यांच्या साक्षीत असे कथन केले की, त्यांना पोलीसांनी पंचनाम्यासाठी बोलावले होते. त्यांनी त्याचा एका दस्तावर अंगठा घेतला होता. पंचनाम्यावरील त्याचा अंगठा मान्य करुन त्यातील मजकुर त्यास माहित नसल्याचे स्पष्टपणे सांगीतलेले आहे.

६. दि.१३/०२/२०२५ रोजी पोलीसांनी त्यांना जयशंकर पान स्टॉलच्या बाजुला, पारा चौक, पारा, ता. वाशी, जि. धाराशिव येथे पोलीसांनी त्यांचे समक्ष आरोपीच्या ताब्यातून १८० मि.ली. च्या देशी दारु स्पेशल संत्रा कंपनीच्या २४ सिलबंद बाटल्या, एकुण किंमत रु.१,६८०/– जप्त केली, त्यापैकी प्रत्येकी एक बाटली रासायनिक पृथःकरणाकरीता वेगळी काढून घेतले व त्यावर पंचांच्या सहीचे लेबल लावले याबाबत सदर साक्षीदाराने त्याचे सरतपासात कोठेही कथन करताना दिसुन येत नाही. त्यामुळे प्रस्तुत साक्षीदाराची साक्ष पाहता घटनास्थळ जप्ती पंचनामा सिध्द झाला असे म्हणने योग्य होणार नाही.

७. अभियोग पक्षातर्फे उपरोक्त साक्षीदाराव्यतिरिक्त तपासी अधिकारी, पंच अथवा इतर कोणत्याही साक्षीदाराची साक्ष नोंदवण्यात आली नाही. अभियोग पक्षाच्या कथनांना पाठिंबा देण्यासाठी अभियोग पक्षातर्फे इतर कोणताही सबळ, स्वतंत्र व प्रत्यक्षदर्शी पुरावा अभिलेखावर आलेला नाही. तसेच दि.१३/०२/२०२५ रोजी जयशंकर पान स्टॉलच्या बाजुला, पारा चौक, पारा, ता. वाशी, जि. धाराशिव येथे आरोपीच्या ताब्यातुन १८० मि.ली. च्या देशी दारु स्पेशल संत्रा कंपनीच्या २४ सिलबंद बाटल्या, असा एकुण किंमत रु.१,६८०/– चा मुद्देमाल जप्त केला या बाबी अभियोगपक्षाचे एकमेव साक्षीदाराच्या साक्षीतुन निःसंशयरित्या शाबीत झालेल्या नाहीत. त्यामुळे आरोपी वर नमुद मुद्देमाल स्वतःच्या कब्जात बाळगताना मिळून आला, हे अभियोग पक्षाचे म्हणणे ग्राह्य धरता येणार नाही.

८. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ अंतर्गत दाखल होणा–या खटल्यांमध्ये न्यायवैद्यकीय प्रयोगशाळेकडून प्राप्त होणा–या अहवालास विशेष महत्व असते. प्रस्तुत प्रकरणात

अभियोग पक्षाने रासायनिक विश्लेषकाचा अहवाल दाखल केलेला नाही. त्यामुळे जप्त मुद्देमाल ही दारु होती, हे अभियोग पक्ष शाबीत करु शकला नाही. एकंदरीत, अभियोग पक्ष आरोपीविरुध्द गुन्हा संशयापलीकडे सिध्द करण्यास अपयशी ठरला आहे. करिता, मुद्या क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येतो.

**मुद्या क्र. २ करिता :**

९. अभियोग पक्षातर्फे सादर करण्यात आलेला पुरावा आरोपीवरील दोषारोप सिध्द करण्यास पुरेसा नसल्याने मुद्या क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात आला आहे. परिणामतः, आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मुद्या क्र.२ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो :

**आदेश**

१. आरोपी नामे अशोक दादाराव गवळी, रा. पारा, ता. वाशी, जि. धाराशिव यांना महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्यातून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८ नुसार निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र व जामीनपत्र रद्य करण्यात येतात.

३. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ नुसार रु.५०,०००/- चे वैयक्तिक बंधपत्र द्यावे.

४. जप्त मुद्येमाल, १८० मि.ली. च्या देशी दारु स्पेशल संत्रा कंपनीच्या २४ सिलबंद बाटल्या, पूर्वी नष्ट केला नसल्यास अपील कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क, धाराशिव यांचेकडे नियमाप्रमाणे नाश करण्याकरीता पाठविण्यात यावा.

MAHADEVI VISHAL PATIL
Digitally signed by MAHADEVI VISHAL PATIL
Date: 2026.07.10 15:05:22 +0530

दिनांक : १०/०७/२०२६
ठिकाण : वाशी

(श्रीमती एम. व्ही. पाटील-राठोडे)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, वाशी.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment / order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Shri. A.M. Wagh, Stenographer, (Grade-III) |
| Court | --- | C.J.J.D. & J.M.F.C., Washi, Tal. Washi, Dist. Dharashiv |
| Date | --- | 10/07/2026 |
| Order signed by the presiding officer on | --- | 10/07/2026 |
| Order uploaded on | --- | 10/07/2026 |